Vol. 5 | No. 5 | October 2019
Impact Factor: 4.197 | ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue On

## IMPACT OF SOCIAL MEDIA ON SOCIETY




Guest Editor
Dr. Vasant Satpute

Associate Editor
Dr. M. D. Kachave

Assistant Editors
Dr. B. V. Andhale
Dr. M. G. Somvanshi
Dr. A. B. Sarkale

IMPACT FACTOR:4.197(IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE

## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

VOL. 5 NO. 5 SPECIAL ISSUE OCTOBER 2019

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue On

# IMPACT OF SOCIAL MEDIA ON SOCIETY

(Book 2)

Late Ramesn Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

*Guest Editor*

**Dr. Vasant Satpute**

*Associate Editor*

**Dr. M. D. Kachave**

*Assistant Editors*

**Dr. B. V. Andhale**

**Dr. M. G. Somvanshi**

**Dr. A. B. Sarkale**

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

२०. सोशल मीडिया आणि आजची वस्तूस्थिती / **डॉ. एम. डी. कच्छवे** | 98
२१. नवतंत्रज्ञानाच्या साह्याने मराठीचे अध्यापन / **सखाराम बा. कदम** | 102
२२. माध्यमांच्या सामाजिक जबाबदारचे अवलोकन / **डॉ. हरिभाऊ कदम** | 106
२३. ग्रंथालय व सोशल मिडिया / **संगिता कातळे** | 110
२४. सोशल मिडीया आणि शैक्षणिक व्यवस्था / **डॉ.कहाळेकर जी.वाय.** | 115
२५. सोशल मिडियाचा समाजावरील प्रभाव / **मनीषा तु. खंडाळे** | 118
२६. सोशल मीडिया आणि सायबर गुन्हेगारी / **डॉ.सचिन खोकले** | 123
२७. ग्रंथालयात सोशल मीडीयाचा वापर– एक दृष्टिक्षेप /
**कु. शारदा के. लांजेकर** | 126
२८. साहित्य आणि सोशल मिडिया / **डॉ. राम मायकर** | 132
२९. सोशल मिडीया- आनंददायी भस्मासुर / **डॉ. मोहन मिसाळ** | 135
३०. प्रसार माध्यमाचे बदलते स्वरूप / **डॉ.अंभुरे एस.डी** | 138
३१. समाजमाध्यमांचा सुनियोजि तवापर महिलांसाठी वरदान /
**डॉ. जयदेवी पवार** | 141
३२. माध्यमांची सामाजिक बांधीलकी : एक चिंतन / **डॉ.श.द. परळकर** | 145
३३. पत्रकारिता आणि सोशलमिडीया / **समाधान दराडे** | 149
३४. सोशल मिडीयाची बॅकींग क्षेत्रातील भूमिका / डॉ.सावके भागवत शा. | 155
३५. समाजासमोरील सोशल मिडीयाचे नवीन आव्हाने / **डॉ.शिंदे सुरेखा स.** | 158
३६. प्रसारमाध्यमातून मराठी साहित्यदर्शन : एक शोध /
**डॉ. नामदेव सोडगीर** | 161
३७. सामाजिक माध्यमांचा प्रशासनावरील प्रभाव /
**डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)** | 166
३८. कृषि क्षेत्रावरील समाजमाध्यमांचा प्रभाव /
**स्वप्नील उबाळे / प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता** | 173
३९. सोशल मिडीयाची क्रिडा क्षेत्रातील भुमिका व योगदान /
गोविंद वाकनकर | 179
४०. समाजावर सोशल मीडियाचा प्रभाव / **यादव कल्याण द.** | 182
४१. महिला आणि सोशलमीडिया / **आरती श्या. खांबेकर** | 186
४२. राजकारण आणि सोशलमिडिया / **अशोक कि. वाकडे.** | 192

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani

# 20.

# सोशल मीडिया आणि आजची वस्तूस्थिती

**प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे**
संशोधन मार्गदर्शक,सहयोगी
प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी

**प्रस्तावनाः-** सोशल मिडियानेसंपूर्ण जग आपल्या हातात आणून ठेवले आहे. कोणत्याही वेळेस हव्या त्या पद्धतीने व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य मिळाले. आनंद व दुःखाचे क्षण, मनातील असंख्य भावना दुसऱ्यापर्यंत पोहचवून त्यात सहभागी करून घेण्याचे व्यासपीठ या नवतंत्रज्ञाने उपलब्ध करून दिले आहे. 'Social' मीडियाहे मुळात 'Communication' चे संवादाचं माध्यम आहे. दूर राहणारे नातेवाईक, संपर्कात नसणारी मित्रमंडळी या सगळ्यांना बांधून ठेवायला हे इंटरनेटचं जाल कामी येणार येत आहे. कालपर्यंत कपाटात दाबून ठेवलेली गुपितं ही ब्लॉगच्या रूपातून बाहेर येत आहेत.

'सोशल मिडिया'हा आपल्या आयुष्याचा इतका अविभाज्य घटक बनला आहे की, दैनंदिन व्यवहारात नव्हे तर आयुष्यातीलसगळ्यासुखदुःखाच्या घटना सणवार यांनाही प्रवाहात ओढून घेतले आहे. सोशल मिडियाने उत्सवाचा चेहरा मोहराच बदलला आहे. सोशल मिडीया क्षेत्रात माहितीला अनन्य साधारण महत्त्व आहे. सोशल मिडीयामुळे मिळालेले आहे. आपल्या मनातील चांगले विचार सहज दुसऱ्यापर्यंत पोहचविण्यासाठी आणि त्यात त्यांना सहभागी करून घेण्यासाठीहेसोशल मिडीया व्यासपीठ खूप चांगलं आहे.

सोशल मिडीयाने आज जगभरातल बहुतांश नागरिकांचे जीवन व्यापून टाकले आहे. भारतासारख्या विकसनशील देशात या नव समाजमाध्यमांचा वापर आणि पगडा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. फेसबुक, व्हॉटस्अपचा, टीवटर (Twtterl) वापर हा जीवनाश्यक सवयींचा भाग बनत चालला आहे. भारतात सोशल मिडियामुळे सामाजिकसलोखा बिघडणे, हिंसक कृत्य करण्यास प्रवृत्त करणे असे प्रकार घडतात. वैयक्तीक स्वार्थ जपण्याचा प्रयत्नही या माध्यमातूनहोताना दिसतो. आज व्यक्ती संकुचित विचारांच्या, मानसिकतेच्या बनत चालल्या आहेत का याचा शोध अभ्यासक घेत आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे जगातील अब्जावधी लोकांच्या जीवनात फार वेगाने बदल घडताना आपण पाहतो. या सर्व प्रकारच्या तंत्रज्ञानात माहिती आणि संवादाचे तंत्रज्ञान सर्वात आघाडीवर आहे. सर्वांना सर्व प्रकारची माहिती मिळत आहे. इंटरनेटही चैन्नीची बाब नसून आवश्यक बाब बनली आहे. घराबाहेर पडताना घरातील मंडळी रुमाल घेतला का ? पैसे व्यवस्थीत ठेवले का

...udkar (ACS) College, Sonpeth, Late Ra... Dist. Parbhani

?आता त्या ठिकाणी मोबाईल, लॅपटॉप घेतला काहे विचारले जात आहे. अशी आजची वस्तुस्थिती आहे.

**संशोधनाचे उद्देश :-** संशोधनाचे खालीलप्रमाणे उद्देश निश्चित करण्यात आलेले आहेत.

१. सोशल मिडीयाचा इतिहास शोधणे.
२. सोशल मिडीयाचे फायदे शोधणे.
३. निष्कर्ष काढणे.

**संशोधनाची गृहीतके :-** सदरसंशोधनाची खालीलप्रमाणे गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

१. अलिकडच्या काळातीलतरूणसोशल मिडीयाचा वापर करत आहे.
२. सोशल मिडीयामुळेतरूणात नैराश्य, मत्सर, एकटेपण येत आहे.
३. सोशल मिडीयाहे एक चांगले माध्यम आहे.

**अभ्यास पद्धती :-** सदर शोध निबंधासाठी द्वितीय साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला असून त्यात संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील अग्रलेख, मासिके, इंटरनेट इत्यादीचा वापर करून निश्चित उद्देशानुसार शोध निबंध तयार करण्यात आलेला आहे.

**सोशल मीडिया (Social Media) :-** 'सिक्स डिग्रीज' नावाचे पहिले सामाजिक माध्यम इ.सन. १९४७ मध्येसंकेतस्थळ सुरु झाले. १९९९ मध्ये ब्लॉगिंग सुरू झाल्यानंतर २००० मध्ये लिक्ड - इन, मायस्पेस, २००५ मध्ये यूट्यूब आणि २००६ मध्ये फेसबुकने सामाजिक माध्यमाच्या रुपाने इंटरनेटची परिभाषाच बदलून टाकली. लोकांची अधिकाधिक माहिती गोळा करणे आणि प्राप्त माहितीच्या विक्रीतून पैसे मिळवणे हेचत्यांचे उत्पन्नाचे साधन बनले. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत बहुसंख्य जनता त्याच्या आहारी गेले आहेत. आजच्या तरूण पिढीला 'फोमो' (FOMO) 'फिअर ऑफ मिसिंग आऊट' सारखे मानसिक आजारहोत आहेत. त्यामुळे नकळत दु:ख, नैराश्य, मत्सर आणि एकटेपण अशा समस्या जडल्या आहेत. यामुळेहत्या, आत्महत्या, अपघात आणि हिंसाचार यांचे आकडेचिंताजनक आहेत. मानसिक आरोग्य ही एक जागतिक समस्या होऊन बसली आहे. ही माध्यमे खुली असल्यामुळे सतत कोणीना कोणी फोटो, मेसेज, कमेंटस् करीत असते. कोणत्याही वेळी संभाषण किंवा संवाद सुरु करण्यासाठी आपले मत देण्यास सांगितले जाते. यामुळे किशोरवयीन मुले स्वत:ची निर्णय क्षमता हरवून बसतात. पूर्वी अकाशवाणी हे भारतातील सर्वात प्रभावी माध्यम समजले जायचे आता तंत्रज्ञानाच्या युगात या प्रगतीबरोबरच माध्यमांचीसाधनही वेगानं बदलली. फेसबुक, व्हॉटसअॅप, ट्विटर, इन्स्टाग्राम, टेलिग्राम, एसएमएस, युट्यूब, वेबसाईट, रेडीट, पिंटरेस्ट अशा साधनाबरोबरच वेगवान वृत्तवाहिन्या अशा आधुनिक माध्यमामुळे जगात लहानशा

Dist. Parbhani

खेड्यात घडलेली घटनाही कांही मिनीटातच जगभरात पोहचत आहे. मोबाईल शोध लागल्यानंतर मानवी जीवनाचे क्षितीज विस्तारले. हाताच्या मुठीतसंपूर्ण जग अवतरल्याचा आविर्भाव व्यक्त होऊ लागला. स्मार्टफोनचा उदयहोताच फेसबुक, व्हॉटसअॅप, इंस्टाग्राम, ट्विटरने जगभरात व्यक्त होण्याचीसंधी मिळाली आहे. शहराप्रमाणेच ग्रामीण भागातही स्मार्टफोन वापरण्याची संख्या झपाट्याने वाढत आहे. प्राथमिक शाळा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडे आता स्मार्टफोन आढळत आहे.

अलीकडेतरूण रोजचे कांही तास सोशल मिडीयावर घालवतात. सोशल मिडीया आपल्या रोजच्या आयुष्यावर पभाव पाडणार माध्यम बनलं आहे. तरूण - तरूणी बरोबरच पौंगडावस्थेतील मुलांच्या आयुष्यावरही सोशल नेटवर्कींग साइटचा परिणाम झालेला दिसून येतो.

**सोशल मिडीयाचे फायदे :-** सोशल मिडीयाचे खालील फायदे बदलत्या काळात पहावयास मिळतात.

**माहितीची देवाण - घेवाण करता येते :-** सोशल मिडियाच्या माध्यमातून अनेक गोष्टींची माहिती मिळत असते. आपल्या सभोवताली काय सुरु आहे. कित्येक किलोमीटर दूर असूनही एकमेकांच्या संपर्कात राहणे, एकमेकांशी संवाद साधनेही यामुळे शक्य होते. अशा प्रकारच्या संवादामुळे विविध ठिकाणं, तिथली शिक्षण पद्धती, कामाच्या आणि शिक्षणाच्या संधी, संस्कृती इत्यादीचा माहिती मिळते.

**संपर्क साधता येतो :-** प्रसार माध्यमामुळे विद्यार्थ्यांना आपल्याला नेमकं काय हवं आहे. एखाद्या कारखान्यात जीतरूणाई करिअर करण्याचं स्वप्न पाहते त्या कारखान्यात शिक्षणाच्या, नोकरीच्या संधी किती आहेत ? प्रत्यक्षात कामे करताना अनुभव कोणते येतात. कोणती कौशल्य आवश्यक आहेत इत्यादीची सर्व माहिती अनुभवी व्यक्तीकडून मिळविणे सहज शक्य होते.

**डिजिटलसाक्षरता :-** प्रसार माध्यमावर आपले डिजिटल क्षेत्रातील कौशल्य हायलाइट करून इतरांना सांगता येते. आज कोणत्याही क्षेत्रात काम करायचे असलेतरी डिजिटलसाक्षरहोणे आवश्यक आहे. जेवढ्या लवकर तुम्ही या जगात प्रवेश करताल तेवढ्या अनेकसंधी तुमच्यासाठी उपलब्ध होऊ शकतात. याचा योग्य वापर केलातर मोठ्या प्रमाणात फायदा आहे.

**उज्ज्वल भवितव्य घडविता येते :-** सोशल मिडीया साईटवर तरूण मंडळी आपल्या आवडीनिवडी, धंदा यांच्या आधारे आपले ग्रुप्स निर्माण करुन चर्चा करू शकतात. यामुळे आपल्याला माहित असणाऱ्या किंवा आपल्याला हव्या असणाऱ्या संधीच्या माहितीची देवाण - घेवाण करणे यामुळे शक्य होते. अनेक विद्यार्थ्यांना आपली आवड इतरांना दाखवता येते.

**उत्पन्नाचा स्रोत :-** याचा वापर विविध प्रकारचा व्यवसाय करण्यासाठीतो व्यवसाय वाढविण्यासाठी करता येऊ शकतो. सोशल मिडीया साइटच्या मार्फत जनसंपर्क

बाढवून अधिकाधिक व्यावसायिकसंधी मिळविणे यामुळे शक्य झाले आहे. अभ्यास करत करत असा व्यवसाय वाढवण्याचा असा एखादा प्रकल्प हाती घेऊन स्वतःसाठी पैसे मिळवणं शक्य होऊ शकते.

**निष्कर्ष :-** सोशल मिडिया केवळ मनोरंजन, अपप्रचार व वेळ घालविण्याचे साधन नाही. खुशाली विचारने, शुभेच्छा देणे, संवेदना आणि मानसिक आधार देण्याचे काम या माध्यमातूनहोते. अलीकडच्या काळाततर फेसबुकवरील कुबेर या मैत्रीसमुहाने पुरग्रस्तासाठी तब्बल नऊ लाखांचा विधी जमविला आहे. सोशल मिडियाचा वापर जगभरातील विखुरलेल्या लोकामधील अंतर कमी करण्याचा उद्देश या पाठीमागेहोता. परंतु सामाजिक जीवनातल्या कुविचारांमुळे सोशल मिडियाचा वापर विध्वंसासाठी होत आहे. आजच्या काळात सायबर बुलिंग, सायबर, स्टॉकिंग, इंटरनेट, ट्रॉलिंग, अपमान, अश्लील पोस्ट इत्यादीमुळे लहान मुलाचे शोषण केले जात आहे.

सोशल मिडियाहे माध्यम जास्तीत जास्त मित्रांच्या संपर्कात राहण्यासाठीतयार झालेले माध्यम आहे. आता या माध्यमावर आपले किती मित्र आहेत, सेल्फी घेताना जीव गेला, फेसबुकच्या माध्यमातून लाखे लोकांना गंडा घातला जात आहे. व्हॉटसअप ग्रुप चॅटवरून भांडणें होत आहेत. आपापल्या मनातला राग - द्वेष करायला जागा मिळाली आहे. सोशल मिडियावर राहणारी माणसं जास्त एकटीहोत आहेत. आपल्या मित्रापैकी कोणाचातरी महागड्या रेस्टारेंट मध्ये खाताना, पिताना, फोटो बघतो तेव्हा त्यालाही मनातून वाटते माझा फोटो टाकणार. असे चित्र सोशल मिडीयामुळे पाहावयास मिळते.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**


१. डॉ. सर्जेराव निमसे : राजकारण आणि माध्यमाच्या संबंधाचे वास्तवचित्रण दै. सकाळसप्तरंग दि. ०४.०८.२०१९

२. प्रा. योगेशहांडगे : 'सायबर सिटी' सोशल मिडिया फायदे आणि तोटे दि. ०३ ऑक्टोंबर, २०१७

३. सुनिल खांडवहाले : सोशल मिडिया : व्यसन मुक्तीची गरज दिव्य मराठी दि. १७ एप्रिल १९९७

4. प्रहारसंपादकीय फायदे कमी, नुकसान जास्त दि. १७ एप्रिल, २०१७


❑❑❑


Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani